# निवृत्ती

राम शिर्केला हायकोर्टाने निर्दोष ठरवले. त्याला नोकरीवर परत घेण्याचा अन् पूर्ण नुकसान भरपाई देण्याचा सरकारवर आदेश काढला....

न्यायमूर्तींनी दिलेला हा निकाल ऐकताना रामच्या कानात प्राण गोळा झाले होते. जो निकाल मिळविण्यासाठी त्याने गेली पाच वर्षे जिवाचे रान केले होते, मानसिक कुतरओढ सोसली होती, आर्थिक आणि शारीरिक झीज सोसली होती तो मिळाल्यावर त्याच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. ताण नाहीसा होताच स्प्रिंग जशी जरा वेळ थरथरत राहते तसे त्याचे शरीर क्षणभर कंप पावले. कृतज्ञ नजरेने त्याने न्यायमूर्तींकडे पाहिले अन् तो कोर्टाबाहेर पडला.

असोसिएशनचे अध्यक्ष श्री. कोहळे नि उपाध्यक्ष श्री. बोकारे यांनी त्यांचे हारतुऱ्यांनी स्वागत केले. 'राम शिर्केकी जय !' ह्या घोषणेने कोर्टाचे आवार गुंजून उठले. बंदुकीच्या गोळीच्या वेगाने हा निकाल बाहेर जमलेल्या असोशिएशनच्या कार्यकर्त्यांना कळला होता.

हारतुऱ्यांचा सस्मित वदनाने स्वीकार करून रामने सर्व कार्यकर्त्यांना अभिवादन केले, त्यांचे आभार मानले अन् आपल्या वकिलाशी हस्तांदोलन करून तो पुढे चालू लागला. त्याबरोबर रामच्या, असोसिएशनच्या नि कामगार एकतेच्या नावाने नारे लावत सर्वजण त्याच्यामागे चालू लागले. अध्यक्ष कोहळे नि उपाध्यक्ष बोकारे रामच्या बाजूने झाले. दोन उत्साही कार्यकर्त्यांनी संघटनेची पताका समोर धरली. एक छोटीशी मिरवणूकच ऑफिसकडे निघाली.

रामच्या नेहमीच्या गंभीर मुखावर आता औपचारिक स्मित उमटलेले असले तरी इतरांचे चेहरे मात्र हर्षाने फुलून आलेले होते. मिळालेला अनपेक्षित विजय व्यक्तिश: रामचा असला तरी त्यासाठी सर्वांनीच श्रम केले होते, त्याग सोसला होता. अन् म्हणूनच हा विजय वैशिष्ट्यपूर्ण होता. अभिमानाने मस्तक उन्नत करविणारा होता. कामगार चळवळीला या विजयाने एक निराळेच वळण मिळणार होते.

रस्त्याने चालताना रामचे मन मात्र ह्या विजयोत्सवात नव्हते. दिलेल्या लढ्याची उजळणीच त्याच्या मनात परत सुरू झाली होती.

१९६० साली केंद्र सरकारच्या नोकरांनी केलेल्या देशव्यापी संपात रामने आपल्या ऑफिसचे नेतृत्व केले होते. आणि तो संप त्याच्या ऑफिसमध्ये

नव्वद टक्के यशस्वी झाला होता. साऱ्या देशात रामच्या ऑफिसचे अन् अनुषंगाने त्याचे नाव झाले होते. रामसारखा धडाडीचा कार्यकर्ता ह्या लढ्यातून कामगार चळवळीला मिळाला होता. उदयास आला होता !

अर्थात नोकरशाहीने त्याला प्रथम सस्पेंड करून नि नंतर नोकरीतून काढून त्याचा बळी घेतला होताच. आरोप संपाचं नेतृत्व केल्याचा !

'नेतृत्व !.... एक फसवा शब्द !!' राम मनातच उद्‌गारला. पुढील काळात त्याला समजून आले होते की, त्यावेळी भरतीच्या लाटेवर तो केवळ वर चढविला गेला होता. अन् नेतृत्वाची माळ त्याच्या गळ्यात विनासायस पडली होती.

पण त्यावेळी कुठे आपल्याला तसे वाटले होते ? आपल्यावरही त्यावेळी नेतृत्वाची धुंदी चढली होती. कामगार एकतेवर आपली अलोट श्रद्धा होती. मध्यमवर्गाच्या मर्यादा आपल्याला ओळखता आल्या नव्हत्या. कामगार एकता ह्या आणखी एका फसव्या शब्दाने आपल्याला चकवले होते ! रामने मनात कबूल गेले.

मिरवणूक आकाशवाणी चौकात आली होती. तिथे असलेल्या केंद्र सरकारच्या दुसऱ्याच एका ऑफिसच्या कर्मचाऱ्यांनी रामच्या नावाने घोषणा करून त्याचे स्वागत केले. गळ्यात हार घातले. राम भानावर आला. त्याच्या मनातले विचारचक्र थांबले. त्याने सभोवती पाहिले. तो तोच चौक होता.

बेसावध क्षणी पाठीत सुरा खुपसून रामचा जेव्हा नोकरीत बळी घेतला गेला तेव्हा ह्याच चौकात सर्व केंद्रिय सरकारच्या नोकरांची विराट सभा भरली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या या दुष्टाव्याचा निषेध म्हणून पुन्हा या शहरातील सर्व केंद्रिय सरकारी नोकरांनी संप करण्याची भाषा, प्रथम ह्या सभेत कार्यकर्त्यांनी काढली होती – आणि रामने एकट्याने साऱ्यांना विरोध केला होता.

एका व्यक्तिकरता साऱ्या कर्मचाऱ्यांवर संकट आणण्याचा तो विरूद्ध होता.

सार्वत्रिक संप तसा यशस्वीच झाला होता. सरकारी नोकऱ्यांच्या बहुतांश मागण्या या ना त्या मार्गाने सरकारने मान्य केल्या होत्या. कर्मचाऱ्यांनी नुकतेच सुटकेचे श्वास टाकले होते. ते समाधान पावले होते.

अशावेळी त्यांना संपात परत ओढणे निर्दयपणाचे ठरले असते. देशव्यापी नसल्याने तो दडपला गेला असता अन् आणखी काही कार्यकर्त्यांच्या जीवनाची

धुळधाण उडाली असती.

'अशा मोठ्या लढ्यात आपल्यासारखे बळी जाणारच' असे समजावून सांगून रामने मोठ्या मुश्किलीने ह्या विचारापासून सर्वांना परावृत्त केले होते.

'पण तो त्या क्षणाचाच उद्रेक नसेल काय ?' वारंवार उभा झालेला हा प्रश्न आताही रामच्या मनात परत डोकावला. हा संप खरेच झाला असता अशी रामला आता खात्री उरली नव्हती.

'आपलं परावृत्त करणं केवळ निमित्तमात्र झालं इतकचं !' राम पुटपुटला. चौकातील छोट्याशा मेळाव्यासमोर त्याने आभाराचे दोन शब्द सांगितले, हात जोडून नमस्कार केला, अन् तो समोर निघाला.

आठवणींची साखळी पुन्हा जोडली जाऊ लागली.

बरीच सल्लामसलत होऊन शेवटी रामची केस हायकोर्टात दाखल केली गेली. राम ही केस ज़िद्दीने लढला. तो स्वत: लॉ झाला असल्याने त्याच्या वकिलाला त्याने सर्व प्रकारची मदत केली. पॉईंटस् काढून दिले होते, आर्ग्युमेंटस् लिहून दिले होते.

अशोसिएशनचे पदाधिकारी तसे खात्याच्या चौकशीत निराश झाले होते. त्यांना रामच्या केसमध्ये दम नाही असे मनोमन वाटू लागले होते. उपोषणाचा मार्ग त्याने चोखाळावा असा विचार त्यांच्या मनात डोकावू लागला अन् अशा परिस्थितीत रामने हायकोर्टात केस करायचे ठरविले, तेव्हा तेच पदाधिकारी त्याच्या पाठीमागे त्याच्या ह्या निर्णयाबद्दल नापसंती बोलून दाखवू लागले.

संप झाल्याला दोन वर्ष उलटून गेली होती. सर्वसामान्य नोकरवर्ग आपल्या दैनंदिन जीवनात परत रमून गेला होता. लढ्याचे स्पिरीट त्यांच्यात उरले नव्हते. पैशापैशाचा नेहमीचा हिशेब त्यांच्या वृत्तीत परत येऊ लागला, अन् त्याचेच प्रतिबिंब त्या त्या वर्षीच्या असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यात पडू लागले होते. रामच्या कोर्टाचा खर्च त्यांना लोढणे वाटू लागला होता.

'ही इज एन्कॉशिंग हिज सॅक्रिफाइस.'

काही लोकांचे मत होते !

मध्यमवर्गीयांचे ते दर्शन रामला पहिल्यांदाच होत होते. मोठ्या मुष्कीलीने त्याला लोकमत वळवावे लागले होते.

घोषणांचा आवाज अधिकच वाढला तसा राम आपल्या तंद्रीतून भानावर

आला. मिरवणूक ऑफिसच्या पोर्चमध्ये आली होती. सारे कर्मचारी पोर्चमध्ये रामचीच वाट बघत जमा झाले होते. विजेच्या वेगाने ही बातमी त्यांना कळली होती. मिरवणूक पोर्चमध्ये शिरताच साऱ्यांनी रामचा मोठमोठ्याने जयजयकार केला. अन् वातावरण दणाणून सोडले.

पोर्चचा दगड नि दगड आज रामच्या जयघोषाने निनादत होता. पण त्याच पोर्चच्या प्रत्येक दगडाला ह्या क्षणी एक निराळाच इतिहास आठवत होता.

प्रकरण कोर्टात दाखल झाले. खर्च असोसिएशन करणार होती, पण तेवढ्याने भागण्यासारखे नव्हते. तोपर्यंत रामचा निर्वाह चालवण्याचा प्रश्न होता. दर महिन्याला नऊशेच्या जवळपास मिळणारा पगार बंद झाला होता आणि चार मुला-मुलींचा संसार रेटायचा होता. एक मुलगा प्री-युनिव्हर्सिटीला होता. सर्वात मोठी मुलगी लग्नाची होती.

असोसिएशनजवळ फारसा फंड उरला नव्हता. संपाच्या वेळी खर्च फार झाला होता. मासिक वर्गणीत सारे भागण्यासारखे नव्हते. मध्यवर्ती संघटनेजवळ अशा अनेक केसेस आल्या असल्याने तिकडूनही काही मदत मिळणे शक्य नव्हते. ऑफिसच्या कर्मचाऱ्यांकडून कोर्टाच्या खर्चाचा बोजा नियमितपणे असोसिएशन वसूल करीत होती. अधिक भार त्यांच्यावर टाकणे पदाधिकाऱ्यांना योग्य वाटत नव्हते.

एक जाडेभरडे धोतर, तसाच सदरा, वाढलेली दाढी अन् कटिंग न केलेले केस, मानेवर रूळणारे केस अशा अवतारात राम पोर्चमध्ये पगाराच्या दिवशी उभा राहू लागला. हातातली पिशवी बाहेर पडणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यासमोर धरत.

एकेकाळी हेडअकाऊंटंट म्हणून मानाने वावरलेल्या रामच्या ह्या दर्शनाने पोर्चचा फत्तर नि फत्तर पाझरला होता.

रामचा चेहरा स्मितयुक्त ! लाचारीचा लवलेश नसलेला ! देणाऱ्या आणि न देणाऱ्याबद्दलहि कोणतेच मतप्रदर्शन चेहऱ्यावरील एका रेषेनंही नाही !

त्याच्याबरोबर काही सरकारी नोकर, आता 'क्लास टू' झालेले, त्याच्याकडे तुच्छतेने पहात निघून जात. काही औपचारिकपणे बोलत, अवघडल्यासारखे ! खोटा ओलावा आणूनही काही विचारपूस करीत. पण चारचार आकड्यांचा पगार मिळविणाऱ्या ह्या लोकांकडून चार रुपयेसुद्धा पिशवीत

पडत नसत. अशावेळी राम नुसता आतून पेटून निघायचा ! पोर्चच्या कमानी शरमेने वाकून जायच्या.

आता मोठ्या उजळ माथ्याने गळ्यात हार घालायला समोर आलेला सेक्रेटरी राघवन तेव्हा, डोळे बारीक करून मुत्सद्दीपणाचा आव आणीत इतरांजवळ म्हणाला होता की, "रामला व्यवहार कळत नाही....."

'आपल्यासारख्या मध्यमवर्गातील लोकांना ताठा परवडत नाही. सरळ माफी मागून मोकळं व्हायचं, इतर कार्यकर्त्यांसारखं ! पण हे पडले धर्मराजाचे अवतार ! सत्यनिष्ठ !! खात्याच्या चौकशीत ह्यांनी माफी मागायला नकार दिला. गेली ना नोकरी ? Really Ram has got no diplomacy.

असे होते खरेच ! दीडदोन हजाराच्या कचेरीतून इतकी क्षुल्लक रक्कम जमा व्हायची की रामला त्यातून महिना काढताना तारेवरची कसरत करावी लागत असे. अशावेळी रामच्या मनात घालमेल सुरू व्हायची. आपण एवढा त्याग करून काय मिळविले ? लोक आपल्याशी एवढे कृतघ्न कसे होऊ शकतात ? ज्यांच्यासाठी आपण सतीचे वाण पत्करले त्यांनीच तोंड चुकविण्यासाठी पगाराच्या दिवशी मागच्या दाराने पळून जाण्याचा विक्रम का करून दाखवावा ? पिशवीत जमा होणाऱ्या तुटपुंज्या रकमेचा हिशेब मागण्यापर्यंत काहींची मजल जावी ? साध्या कारकुनापासून तो तहत् मोठ्या ऑफिसरपर्यंत साऱ्यांची एक वृत्ती !!

हे अन् असे अनेक प्रश्न त्याला भंडावून सोडत !

मनुष्य स्वभावाचे कोडे त्याला तेव्हापासून पडले होते अन् अनुभवांची उत्तरोत्तर भर पडून ते अधिकच गुंतागुंतीचे होऊ लागले होते. आजहि तो त्या मेळाव्याकडे मोठ्या अचंब्याने पाहात होता. विस्मयचकित होत होता. मनातून मात्र त्याला ह्या साऱ्या प्रकारची उबग आली होती. घृणा वाटत होती.

पण चेहऱ्यावर त्याला छापील स्मित ठेवणे भाग होते. ते त्याला आता मुळीच कष्टाचे वाटत नव्हते. गेल्या काही वर्षात त्याला ही कला साध्य झाली होती. मनाची नि चेहऱ्याची ताटातूट करण्यात तो यशस्वी झाला होता.

पोर्चच्या आत नि बाहेर कार्यकर्त्यांची अन् इतर कर्मचाऱ्यांची एकच झुंबड उडालेली होती. अध्यक्ष नि उपाध्यक्ष मध्येच कुठेतरी गायब झाले होते. लोकांनी रामला घेरले होते अन् ते त्याच्यावर प्रश्नांचा भडिमार करीत होते. राम त्यांना यांत्रिकपणे काहीतरी उत्तरे देत होता.

इतक्यात कोहळे लगबगीने चालत रामकडे आले अन् कपाळावरचा घाम रुमालाने पुसत म्हणाले, "सर्व सेक्शनमध्ये जाऊन सर्वांचे आभार मानायचा कार्यक्रम ठरला आहे. नंतर ऑफिस सुटल्यावर सभा..."

मधली सुटी संपल्यावर एकेका विभागात जाऊन आभार मानण्याचा कार्यक्रम सुरू झाला. त्याचवेळी रामच्या हस्ते पेढेही वाटण्यात येऊ लागले.

जो तो रामची स्तुती करीत होता. त्याने केलेल्या निःस्वार्थ निरलस सेवेची, त्यागाची, त्याच्या धैर्याची ! अन् प्रत्येक वेळी रामच्या मनातील उद्वेग तीव्र होत होता.

कंट्रोलिंग सेक्शनच्या सुपरिन्टेडेंटने तर राम सेक्शनमध्ये शिरताच त्याला मिठी मारली, डोळ्यात अश्रू आणले. रामने मिठी सोडवून त्याला थोपटल्यासारखे केले, पण त्याचवेळी त्याच्या त्या पोक आलेल्या पाठीवर सणसणीत गुद्दे ठेवून द्यावे असे त्याला वाटून गेले.

'राम छुपा कम्युनिस्ट आहे. त्याला पार्टीकडून पैसे मिळत असावे, त्याशिवाय का तो एवढ्या ताठ्यात वावरतो ?" असे हाच लोंढे त्यावेळी म्हणाला होता. त्याच्या मताने रामला मदत म्हणजे 'देशद्रोह' होता.

लोंढेने सुरू केलेला हा अपप्रचार जेव्हा रामच्या कानावर गेला तेव्हा तो भयंकर संतापला. असली अपमानास्पद भाषा अन् तीहि आपल्या जिव्हाळ्याचा मित्र म्हणविणाऱ्याने करावी हे तो सहनच करू शकला नाही. संतापाच्या भरात त्याने एक तारखेला पोर्चमध्ये उभे राहाणे बंद करण्याचा त्याच क्षणी निर्धार केला. अन् तरी पण त्याची तगमग नाहीशी होत नव्हती.

घातला गेलेला घावच इतका तीव्र होता की तो त्याच क्षणी लोंढ्याला जाब मागायला निघाला होता. जानकीने, रामच्या बायकोने त्याला आवरले नसते तर प्रसंगाने कोणते वळण घेतले असते हे आज देखील राम सांगू शकत नव्हता.

आजदेखील, त्यानंतरच्या आठवणीने रामच्या अंगावर शहारे आले.

एक तारखेची प्राप्ती बंद झाल्याने प्रपंच चालविण्यासाठी जानकीबाईंना शिक्षिकेची नोकरी पत्करावी लागली होती. त्यांच्या तुटपुंज्या पगारात प्रपंच चालवणे कठीण होते. कॉलेजात जाणाऱ्या मुलाचा खर्च आणि मोठ्या मुलीच्या लग्नाची तजवीज करणे तर अशक्यच होते. हातातोंडाची गाठ पडत होती इतकेच! मुलांच्या तीक्ष्ण नजरांना नजर भिडवणे रामला अशक्य झाले होते. घरातच

त्याचे जीवन परावलंबी, बांडगुळासारखे बनले होते.

अन् बाहेर त्याला सहानुभुतीही मिळत नव्हती. प्रत्येकजण त्याच्याकडे आता संशयाने पाहू लागला होता. खात्याच्या चौकशीतील निर्णयाने तर तो आता कायमचाच नोकरीला मुकला असे सर्वांनाच मनातून वाटत होते. हायकोर्टात केलेली केस 'हटवाद' समजला जात होता. तोंडावर नसली तरी मागे हीच कुजबुज चालत असे !

लोकांना तो आता भारभूत झाला होता !

अन् ह्या सर्व परिस्थितीला कारणीभूत असलेला हा लोंढे आज चक्क आपल्या प्रेमाचे प्रदर्शन करायला मोकळा होताच !

रामला आठवले की, ह्याच लोंढेला आपण पैसे खाण्याच्या आरोपातून वाचवले होते...

मस्तकात उठलेली तिडीक दाबत राम, चेहऱ्यावरचा मेकप उडू न देता बाहेर पडला. अंतरंगातील खळबळ आतच दाबून ठेवत !

आभारप्रदर्शनाचा कंटाळवाणा सोहळा चालूच होता. कित्येक ओळखीचे, नवीन लागलेले, त्याच त्याच जागेत खितपत पडलेले, वशिला लावून वर चढलेले, लाचार, सुस्त, चमक गेलेले चेहरे रामच्या नजरेच्या पडद्यावर उमटत होते, नाहीसे होत होते.... औपचारिक बोलत होते, ओशाळे हसत होते, अभिनंदन करीत होते.... 'खुरटलेला मध्यम वर्ग !' एकच एक प्रतिक्रिया रामच्या मनात उमटत होती.

पाच वाजता ऑफिस सुटले नि लोक भराभर बाहेर पडू लागले. अध्यक्ष कोहळे नि उपाध्यक्ष बोकारे यांची लोकांना थोपवून धरण्यासाठी धावपळ चालू होती. लोक लगेच घरी जाण्याच्या मनःस्थितीत होते. काहीतरी कारणे सांगून सटकत होते. ती सांगतानासुद्धा लाचारीचे हसणे त्यांना आवश्यकच वाटत होते, उलट, कार्यकारिणीच्या सभासदांची त्यांना विनवणी चालली होती.

पोर्चसमोरच काही खुर्च्या व एक टेबल मांडून सभेची तयारी करण्यात आलेली होती. राम त्यापैकी एका खुर्चीवर बसून हे गमतीने पाहात होता. आता त्याला माणूस कळला होता. पाच वर्षांपूर्वी ज्यांच्या करता त्याने आगीत उडी घेतली होती, आपले हात जाळून घेतले होते तीच ही माणसे होती !.... तेव्हा भावनेच्या एका लोंढ्यासरशी लढ्यात उडी घेतलेली !.... तो ओसरताच पुन्हा आपल्या ठरीव चाकोरीतून चालू लागलेली, हेवेदावे माजवणारी, कणाहीन,

हीनदीन, क्षुद्र, मत्सरग्रस्त.

शेवटी, सारे ऑफिस रिकामे झाल्यावर हजार दीड हजाराच्या कर्मचाऱ्यांपैकी दीडदोनशे लोक कसेबसे जमल्यावर सभेची कारवाई सुरू झाली. त्या कंटाळवाण्या कार्यक्रमातून रामचे लक्ष केव्हाच उडून गेले होते. केव्हा एकदाचा हा शेवटचा प्रसंग संपतो आणि आपण मोकळे होतो असे त्याला होऊन गेले होते. गेल्या पाच वर्षात झाली नव्हती एवढी त्याच्या मनाची फरफट आज दिवसभर झाली होती. नेतेपणाचे एवढे जबरदस्त नाटक करीत राहताना तो अगदी थकून गेला होता. थोरपणाच्या मुखवट्याआड गुदमरून गेला होता. आणि ह्या कुबट, तुंबलेल्या वातावरणातून केव्हा एकदाचे बाहेर पडतो अन् गावाबाहेरच्या टेकडीवर आपल्या आवडत्या ठिकाणी जाऊन बसतो असे त्याला होऊन गेले होते !

आज पाच वर्षे त्या रम्य स्थानानं त्याच्या तप्त मनावर वेळोवेळी शीतल, चंदनी लेप लावला होता ! जरा उंच नेले होते.

राम मनाने तिथे असा पोहोचलेला असतानाच त्याच्या कानात ती घोषणा तापलेल्या सांडसासारखी शिरली.

रामसारखा नेता पुन्हा कामगार चळवळीला मिळावा म्हणून अध्यक्ष कोहळे यांनी आपली जागा राजीनामा देऊन रिकामी करून देण्याची घोषणा टाळ्यांच्या गजरात केली होती !

त्या घोषणेने राम तगमगून उठला. मागच्या पाच वर्षाच्या इतिहासाचा कडवट घोट घसा जाळतच त्याच्या हृदयात शिरला. बधीर मेंदूत एक जबरदस्त तिडीक उठली. अन् त्या तिरीमिरीत त्याने आपण प्रत्यक्ष चळवळीतून निवृत्त होत असल्याची घोषणा केली !.....

अन् त्या घोषणेने स्तंभित झालेली ती सभा तशीच सोडून, उतरलेल्या भाराने, शांत, स्वस्थ नि समाधानी मनाने तो आपल्या नेहमीच्या आवडत्या ठिकाणाकडे चालू लागला.

या भौतिक जगापासून दूर ! उंच !! टेकडीवर !!!

---